# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः04.07.2025** **वारःशुक्रवार**

---

1. पाच देशांच्या दौऱ्यादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं आज त्रिनिदाद आणि टोबॅगोमध्ये शानदार स्वागत, भारतीय समुदायाला केलं संबोधित
2. घानाच्या सर्वोच्च नागरी पुरस्कारानं पंतप्रधानांचा गौरव
3. 29 व्या आंतरराष्ट्रीय प्रसारण आणि माध्यम तंत्रज्ञान परिषदेचं दिल्लीत उद्घाटन
4. गृहमंत्री अमित शहा आज पुणे दौऱ्यावर आणि
5. अँडरसन-तेंडुलकर चषक कसोटी क्रिकेट स्पर्धेत शुभमन गिलचं ऐतिहासिक द्विशतक

**<u>पंतप्रधान दौरा</u>**

भारत हा जगभरातील तिसऱ्या क्रमांकाचा स्टार्टअप हब असल्याचे गौरवोद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज पोर्ट ऑफ स्पेन इथं काढले. त्रिनिदाद आणि टोबॅगोमधील भारतीय समुदायाला संबोधित करताना ते बोलत होते. तत्पुर्वी विमानतळावर त्यांचे शानदार स्वागत करण्यात आलं. त्रिनिदाद आणि टोबॅगोमधील भारतीय समुदायाचा प्रवास धैर्याचा असून आपले पुर्वज भारतीय संस्कृतीचे वाहक आहेत असंही ते म्हणाले. पंतप्रधान मोदी यांचा हा पहिलाच त्रिनिदाद आणि टोबॅगो दौरा आहे आणि 1999 नंतरचा भारतीय पंतप्रधानांचा हा पहिलाच दौरा आहे. आपल्या दोन दिवसांच्या दौऱ्यात, पंतप्रधान मोदी अध्यक्षा क्रिस्टीन कार्ला कांगालू आणि पंतप्रधान कमला प्रसाद-बिसेसर यांच्याशी चर्चा करतील तसंच ते त्रिनिदाद आणि टोबॅगोच्या संसदेच्या संयुक्त सभेला संबोधित करतील. तत्पुर्वी काल पंतप्रधानांनी घानाची राजधानी अक्रा इथं घाना संसदेला संबोधित केलं. भारत ही लोकशाहीची जननी असून विविधता ही या रचनेची ताकद असल्याचं यावेळी बोलताना ते म्हणाले.

घानाची लोकशाहीवृत्ती, प्रतिष्ठा आणि स्थिरता यासाठी दृढ वचनबद्धता या गुणाचं त्यांनी कौतुक केलं. आफ्रिकन खंडासाठी हा देश प्रेरणास्थान असल्याचा गौरव योवेळी बोलताना मोदींनी केला. घानाचा सर्वोच्च नागरी सन्मान ऑफिसर ऑफ द ऑर्डर ऑफ स्टार देऊन मोदींचा गौरव करण्यात आला. पंतप्रधान मोदी या दौऱ्याच्या पुढील टप्प्यात, अर्जेंटिनाला भेट देणार आहेत. गेल्या 57 वर्षांत भारतीय पंतप्रधानांचा अर्जेंटिनाचा हा पहिला दौरा असेल.

**<u>संरक्षण खरेदी</u>**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखालील संरक्षण अधिग्रहण परिषदेनं स्वदेशी संरक्षण सामग्रीच्या खरेदीसाठी एक लाख कोटी रुपयांहून अधिक मूल्याच्या दहा प्रस्तावांना मंजुरी दिली आहे. यामध्ये चिलखती वाहनं,

इलेक्ट्रॉनिक युद्ध प्रणाली, तिन्ही सेना दलांसाठी एकात्मिक सामायिक इन्व्हेंटरी व्यवस्थापन प्रणाली आणि पृष्ठभागावरून हवेत मारा करणाऱ्या क्षेपणास्त्रांचा समावेश आहे. या शस्त्रास्त्रांच्या खरेदीमुळे गतिमानता वाढेल, हवाई संरक्षण अधिक प्रभावी होईल तसंच पुरवठा साखळी व्यवस्थापनात आणखी सुधारणा झाल्यानं सैन्य दलांची परिचालन सज्जता आणखी वाढेल असं संरक्षण मंत्रालयाच्या सूत्रांनी सांगितलं.

**BES EXPO**

प्रसार भारतीचे अध्यक्ष नवनीत कुमार सेहगल यांच्या हस्ते काल नवी दिल्लीत 29 व्या आंतरराष्ट्रीय प्रसारण आणि माध्यम तंत्रज्ञान परिषद- BES EXPO 2025चं उद्घाटन करण्यात आलं. गेल्या दहा वर्षात देशातल्या डिजिटल पायाभूत सुविधांमध्ये अनेक पटींनी वाढ झाली असल्याचं सेहगल यांनी यावेळी बोलताना सांगितलं. प्रसार भारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी यावेळी बोलताना म्हणाले की लोक आता अशा टप्प्यावर पोहोचले आहेत, जिथे आशयाचं केवळ जागतिकीकरणच नव्हे तर अत्याधिक वैयक्तिकीकरण आणि अत्याधिक स्थानिकीकरण करणंही शक्य आहे. एआय द्वारे माध्यम क्षेत्राच्या परिदृष्यात परिवर्तन : निर्मिती, सहकार्य आणि आर्थिक उत्पन्न असा यावर्षीच्या परिषदेचा मुख्य विषय आहे.

**अमित शहा**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज पुणे दौऱ्यावर असून काल रात्री त्यांचं पुण्यात आगमन झालं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विमानतळावर त्यांचं स्वागत केलं. अमित शहा यांच्या उपस्थितीत आज विविध कार्यक्रम होणार आहेत. खडकवसला इथल्या राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या परिसरातील त्रिशक्ती प्रवेशद्वारावर थोरले बाजीराव पेशवे यांच्या अश्वारूढ पुतळ्याचं अनावरण अमित शहा यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर शहा राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीतील छात्र आणि सैन्य अधिकाऱ्यांशी संवाद साधणार आहेत. पुण्यातील कोंढवा परिसरातील जयराज क्रीडा संकुलाचं उद्घाटन; तसंच बाळासाहेब देवरस रुग्णालयाची पाहणी ते करतील तसंच वडाची वाडी रस्त्यावर उभारण्यात येणाऱ्या पीएचआरसी हेल्थ सीटीचं भूमिपूजनही अमित शहा यांच्या हस्ते होणार आहे.

**अमेरिका**

अमेरिकन काँग्रेसने राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी, सादर केलेलं कर आणि खर्च विधेयक मंजूर केलं आहे. काल रात्री झालेल्या सत्रात प्रतिनिधी सभागृहाने 218 विरुद्ध 214 अशा मतांनी हे विधेयक मंजूर केलं. यामुळे काही प्रमाणात कर कमी होतील, लष्करावरील खर्च वाढेल आणि मेडिकेड, एसएनएपी आणि स्वच्छ ऊर्जा निधीमध्ये मोठी कपात होईल.

**रशिया-युक्रेन**

रशियानं निश्चित केलेली सर्व उद्दिष्टे साध्य होईपर्यंत युक्रेनविरुद्धची लष्करी मोहीम सुरूच राहील असं रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी काल अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी फोनवरून झालेल्या संभाषणात सांगितलं. दोन्ही राष्ट्राध्यक्षांमध्ये तासभर झालेल्या दुरध्वनी संभाषणानंतर क्रेमलिनचे परराष्ट्र धोरण सहाय्यक युरी उशाकोव्ह यांनी पत्रकारांना याबाबत माहिती दिली. रशिया-युक्रेनदरम्यान सध्या सुरू असलेल्या संघर्षावर लवकरात

लवकर युद्धबंदीची मागणी ट्रंप यांनी केली आहे. युक्रेनसोबत राजकीय संवादाद्वारे आणि वाटाघाटींद्वारे तोडगा काढण्यात पुतीन यांनी तयारी दर्शविली आहे, असं उशाकोव्ह म्हणाले.

**महिला-बालविकास मंत्री**

महिला आणि बालविकासमंत्री अन्नपुर्णादेवी आज झारखंडमधील रांची इथं महिला आणि बालविकास विभागाच्या सावित्रीबाई फुले राष्ट्रीय महिला आणि बाल विकास संस्थेच्या नवीन प्रादेशिक केंद्राचे उद्घाटन करणार आहेत. यामुळे पुर्वेकडेल भागासाठी महिला आणि बालविकास विभागाच्या सेवा पोहोचवण्यासाठी महत्वाचं पाऊल ठरेल. झारखंड, बिहार, ओडिशा आणि पश्चिम बंगाल या राज्या शक्ती अभियान, वात्सल्य, सक्षम अंगणवाडी आणि पोषण 2.0 सारख्या अनेक उपक्रमांच्या प्रशिक्षण आणि नवीन संशोधन करुन संबंधित ठिकाणच्या गरजा पूर्ण करण्यासाठी मदत करेल.

**विधिमंडळ-मुंबई**

महाराष्ट्रात विवाहपूर्व थॅलेसिमिया रोगाची चाचणी बंधनकारक करणार असल्याची ग्वाही सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी काल विधानसभेत दिली. याबाबतचा प्रश्न विकास ठाकरे यांनी विचारला होता. प्रत्येक जिल्ह्यात या रोगावरची उपचार केंद्र सुरू केली जाणार असल्याचंही त्यांनी सांगितलं. महाराष्ट्रातील रुग्णालयांमध्ये सिटी स्कॅन आणि एम आर आय यंत्रांचा तुटवडा अथवा बंद असलेल्या सर्व ठिकाणी या सुविधा दोन महिन्यात कार्यान्वित करण्याचं आश्वासन वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिलं. यासाठी चांगल्या कंपन्यांची यंत्रं खरेदी करण्याकरता आधीच दर निश्चिती करून परवानगी दिली जाईल असं उपमुख्यमंत्री अजित पवार सांगितलं.

**शुभांशू**

आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरील पहिले भारतीय अंतराळवीर भारतीय हवाई दलाचे ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला हे ऑर्बिटल लॅबमध्ये ब्रेन कांपुटर इंटरफेस विकसित करण्यासाठी काम करत आहेत. अमेरिकन अंतराळ संशोधन संस्था नासाने एका ब्लॉग संदेशात हा माहिती दिली. "थॉट्स ओव्हर ग्रॅव्हिटी" नावाच्या या प्रयोगात अंतराळवीर कमी-गुरुत्वाकर्षणाच्या आव्हानात्मक परिस्थितीतही त्यांच्या मेंदूचा वापर अंतराळात संगणकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी किंवा त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी कसा करू शकतात याचा शोध घेण्यात आला. तसंच अंतराळातील वातावरणात लहान जलचर प्राणी कसे टिकून राहू शकतील हे या प्रयोगामुळे समजून घेता येईल.

**विम्बल्डन**

लंडनमध्ये सुरु असलेल्या विम्बल्डन टेनीस स्पर्धेत भारताच्या एन श्रीराम बालाजी यानं पुरुष दुहेरी स्पर्धेत दुसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे. आपला मेक्सिकन जोडीदार मिगएल रायेस-वरेला याच्याबरोबर अमेरिकन जोडीला 6-4, 6-4 असा पराभव केला. पुढच्या फेरीत बालाजी आणि रेयेस-वरेला यांची गाठ चौथ्या मानांकित स्पेनच्या मार्सेल ग्रॅनोलर्स आणि अर्जेंटिनाच्या होरासिओ झेबालोस यांच्याशी पडेल. बुधवारी युकी भांब्री आणि रित्विक बोलिपाल यांनी आपापल्या पहिल्या फेरीतील सामन्यांमध्ये विजय मिळवत पुरुष दुहेरीच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश केला.

**क्रिकेट**

अँडरसन-तेंडुलकर चषकासाठी इंग्लंडमध्ये एजबस्टन इथं सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात भारतीय संघाचा कर्णधार शुभमन गिल यानं द्विशतक झळकावून इतिहास रचला. इंग्लंडमधील कसोटी सामन्यात द्विशतक करणारा तो पहिला भारतीय तसंच पहिला आशियाई कर्णधार ठरला आहे. गिलनं केलेल्या दमदार 269 धावांमुळे भारताला 587 एवढी भक्कम धावसंख्या उभारता आली; त्यामुळे पहिल्या डावात संघाची स्थिती भक्कम झाली आहे. काल दुसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा यजमान इंग्लंडच्या संघाच्या तीन गडी बाद 77 या धावा झाल्या.

**हवामान**

आंध्रप्रदेश, आसाम, मेघालय, कर्नाटकचा किनारपट्टीचा भाग, राजस्थानचा पुर्वेकडील भाग, कोकण, गोवा आणि मध्य प्रदेशांतील काही भागात मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. नागालँड मणिपूर, त्रिपुरा ओडीशामध्येही पावसाचा अंदाज आहे. गेल्या 20 जून पासून हिमाचल प्रदेशात मुसळधार पाऊस सुरूच आहे. ढगफुटी, नद्यांना आलेला पूर आणि भूस्खलनाच्या घटनांमुळे राज्यातील अनेक भागात सामान्य जनजीवनावर परिणाम झाला आहे. हवामान खात्याने आज मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे तर उद्यापासून 9 जुलैपर्यंत अति मुसळधार पाऊस पडेल असा अंदाज आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार